महाराष्ट्र शासन
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती, जि. पुणे.**
प्लॉट नं. १०७, एमआयडीसी, महिला शासकीय ग्रामीण रुग्णालयासमोर, बारामती, ४१३१३३.
EMAIL:- deangmcbaramati@gmail.com WEBSITE:- www.gmcbaramati.com
**मध्यवर्ती ग्रंथालय विभाग**
EMAIL:- librarygmcbaramati20@gmail.com

जा. क्र. शावैमबा/मध्य. ग्रंथालय/नियतकालिक वर्गणी-दरपत्रक-२०२३/४२०-२७/ 4200-07 /२२, दि. 30/११/२०२२.

*महाविद्यालयाच्या संकेतस्थळावरुन दरपत्रकाचे पत्र प्रसिध्द:-*

प्रति,
मा. अधिष्ठाता कक्ष.
शा. वै. म. बारामती.

विषय:- सन २०२३ या कॅलेंडर वर्षाकरीता (जाने. २०२३ ते डिसें. २०२३ या कालावधीकरीता) वैद्यकीय शास्त्रातील भारतीय व परकीय प्रकाशकाच्या नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) भरण्याकरीता/ पुरवठा करण्याकरीता दरपत्रक सादर करण्याबाबत...

संदर्भ:- या विभागाचे दरपत्रकाचे पत्र क्र. शावैमवा/मध्य. ग्रंथालय/नियतकालिक वर्गणी-दरपत्रक-२०२३/४०४/४१२१/२२, दि. १८/११/२०२२.

मा. महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास विनंती करण्यात येते की, सन २०२३ या कॅलेंडर वर्षाकरीता (जानेवारी, २०२३ ते डिसेंबर, २०२३ या कालावधीकरीता) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागासाठी आवश्यक असलेल्या भारतीय व परकीय प्रकाशकाच्या नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) भरावयाची आहे.

यापूर्वी मागील काही वर्षाच्या प्राप्त दरपत्रकाचे व नियतकालिकांच्या पुरवठ्याचे अवलोकन केले असता, मा. ग्रंथपाल यांच्या असे निदर्शनास आले आहे की, काही नियतकालिक पुरवठादार आदेश प्राप्त करुन घेण्याकरीता, काही प्रकाशकाकडून नियतकालिक पुरवठादारांना नियतकालिकांच्या किंमतीवर सूट मिळत नसताना, दरपत्रकात सूट दर्शवून प्रलोभन देणारे, व संभ्रम निर्माण करणारे दरपत्रक सादर करीत असतात. त्यामुळे या पत्राद्वारे आपणास सूचित करण्यात येते की, नियतकालिकांची वर्गणी भरण्याबाबतचे दरपत्रक भरण्यापूर्वी, या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागाने सदर दरपत्रकाच्या पत्रामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीचे प्रथम काळजीपूर्वक अवलोकन करुन, गुड ऑफिसेस कमिटी (GOC), नवी दिल्ली



Scanned with CamScanner

यांच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे नियतकालिक पुरवठादारांनी (आपण) आपले सिलवंद दरपत्रक **मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती, जि. - पुणे, प्लॉट नं. १०७, एमआयडीसी, महिला शासकीय ग्रामीण रुग्णालयासमोर, बारामती, ४१३१३३.** यांच्या नावे सादर करावे. जर नियतकालिक पुरवठादारांचे (आपले) सदरील दरपत्रक या महाविद्यालयाने खाली नमुद केलेल्या अटी, शर्तीनुसार सादर करण्यात आले नाही तर, त्या नियतकालिक पुरवठादाराचे (आपले) दरपत्रक तुलनात्मक तक्त्यासाठी ग्राह्य धरले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**महत्वाचे:-** नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) भरण्याकरीता/पुरवठा करण्याकरीता नियतकालिक पुरवठादारास (आपणास) आदेश दिल्यास नियतकालिकांच्या देयकाची रक्कम या महाविद्यालयाकडून कधी/ केंव्हा हवी आहे, त्यावावत जर आपले काही म्हणने असल्यास, त्यावावत दरपत्रकामध्ये इतर अटी, शर्तीमध्ये स्पष्टपणे नमुद करावे.

## नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) संबंधित प्रकाशकास भरण्याकरीताचे दरपत्रक खालील अटी व शर्ती नुसार या महाविद्यालयास सादर करण्यात यावे.

१) आपणास जर नियतकालिक पुरवठ्याचे आदेश दिल्यास देयकासोवत नियतकालिकांच्या किंमती, नियतकालिकाचा खंड, प्रकाशन वर्ष इत्यादीवावींच्या माहितीकरीता पुरावे सादर करणे गरजेचे असल्यामुळे, नियतकालिक पुरवठादार (आपण) या महाविद्यालयास देयक (विल) सादर करताना देयकासोवत त्या-त्या नियतकालिकांचा, त्या-त्या प्रकाशकाचे प्राईज प्रुफ, वँक रेमिन्टन्स चेकची छायांकित प्रत, प्रकाशकाचा प्राईज प्रुफ देयकासोवत सादर करणे अनिवार्य आहे. (नियतकालिक पुरवठादाराने स्वत:च्या लेटरहेडवर प्राईज प्रुफ तयार न करता, किंवा ॲमेझॉन, फ्लीपकार्ट यासारख्या साईटवरील ऑनलाईन प्राईज प्रुफ सादर न करता, संवधित प्रकाशकांचे प्राईज प्रुफ सादर करणे अनिवार्य आहे.)

२) जर नियतकालिक पुरवठादाराचे (आपले) दरपत्रक स्विकृत झाल्यास, या महाविद्यालयाकडून नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) संवधित प्रकाशकास भरण्याकरीता आपणास आदेश देण्यात आल्यास, गुड ऑफिसेस कमिटी (GOC), नवी दिल्ली यांच्या व या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागाच्या अटी, शर्तीनुसार, **या महाविद्यालयाच्या नावे नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) प्रकाशकास भरताना ज्या बॅंकेमार्फत भरण्यात आली ती पावती/रीसीटची, तसेच PUBLISHER INVOICE COPY (पब्लीशर इनव्हॉईस कॉपी/देयक/बील) ची, तसेच या महाविद्यालयाच्या नावे नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) प्रकाशकास भरल्यानंतर संबंधित प्रकाशकाकडून आपणास प्राप्त होणारी पोहोच PUBLISHER PAYMENT RECEIPT**



Scanned with CamScanner

(पब्लीशर पेमेंन्ट रीसीट) ची एक छायांकित प्रत **HARD COPY** स्वरुपात या महाविद्यालयास **सादर करणे** नियतकालिका पुरवठादारावर (आपणावर) **बंधनकारक/अनिवार्य राहील.**

३) तसेच जर एखाद्या नियतकालिकांचा सुट्टा अंक, विहित कालावधीत प्राप्त न झाल्यास, नियतकालिकांच्या वर्गणीवावत (रक्कमेवावत), सवस्क्रिपशन/आय. डी. नंवरवावत नियतकालिक पुरवठादार (आपण), या संस्थेच्या नावाने संवधीत प्रकाशकास जो काही पत्रव्यवहार, ई-मेल, इत्यादीव्दारे कराल, ती इतंभूत माहिती, तसेच प्रस्तुत प्रकरणी त्यावावत संवंधित प्रकाशकाने उलट टपाली आपणास सदर नियतकालिकाच्या सुट्ट्या अंकावावत जो काही पत्रव्यवहार, ई-मेल, इत्यादी वावींची माहिती सादर करण्यात येत असेल किंवा करणार, त्या सर्व माहितीच्या छायांकित प्रती/ई-मेल या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागास सादर करणे नियतकालिक पुरवठादारावर (आपणावर) वंधनकारक राहील. तसेच प्रस्तुत प्रकरणी जर आपण तसा पत्रव्यवहार केल्यास किंवा त्यास अनुसरुन प्रकाशकाने उलट टपाली माहिती सादर केल्यास, किंवा आपण संवंधित प्रकाशकास उलट टपाली पत्रव्यवहार/ई-मेल केल्यास, त्यावावतचे पुरावे या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागास सादर करणे किंवा कळविणे नियतकालिक पुरवठादारावर (आपणावर) वंधनकारक आहे.

४) सन २०२३ या कॅलेंडर वर्षाच्या (जाने. २०२३ ते डिसें. २०२३ या कालावधीकरीताच्या) नियतकालिकांच्या पुरवठ्याचा हिशोव माहे जून, २०२४ अखेरपर्यंत पूर्ण करणे नियतकालिक पुरवठादारावर (आपणावर) वंधनकारक आहे.

५) गुड ऑफिसेस कमिटी (GOC), नवी दिल्ली यांच्या अटी, शर्तींच्या अनुषंगाने या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागास आवश्यक असलेल्या नियतकालिकांच्या पुरवठ्याच्या हिशोवावावत मध्यवर्ती ग्रंथालय विभागाच्या दृष्टीने नियतकालिकांच्या एकूण आदेशाच्या ५% सुरक्षा अनामत रक्कम म्हणून वँक गॅरंटी या महाविद्यालयाच्या नावे सन जाने. २०२३ ते डिसें. २०२४ या दोन वर्षाच्या कालावधीसाठी द्यावी लागेल. तसेच सदरील रक्कमेची वँक गॅरंटी राष्ट्रीयकृत वॅकेंची (Nationalised Bank) असणे वंधनकारक असून या महाविद्यालयास जमा करणे आवश्यक आहे.

६) या महाविद्यालयाच्या नावाने प्रकाशकास वर्गणी (रक्कम) भरल्यानंतर संस्थेच्या नावे असलेला सवस्क्रिपशन/आय. डी. नंवर, मध्यवर्ती ग्रंथालय विभागास त्वरीत सादर करणे नियतकालिक पुरवठादारावर (आपणावर) वंधनकारक आहे.

७) तसेच या महाविद्यालयाकडून घेतलेली नियतकालिकांची वर्गणी (रक्कम), नियतकालिकाच्या त्या-त्या प्रकाशकास सदरील नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) नियतकालिक पुरवठादाराने (आपण) केंव्हा भरली, त्यावावत पाठपुरावा करण्याकरीता प्रस्तुत प्रकरणी त्या-त्या नियतकालिकाच्या प्रकाशकाचा ई-मेल आय. डी., पूर्ण नाव व पत्ता, दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक इत्यादीची माहिती या



Scanned with CamScanner

महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागास सादर करणे नियतकालिक पुरवठादारावर (आपणावर) वंधनकारक आहे.

८) या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागास आवश्यक असलेल्या नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) भरण्याकरीता नियतकालिक पुरवठादारास (आपणास) आदेश दिल्यानंतर आपण संवंधित त्या-त्या प्रकाशकाकडे नियतकालिकांचे सुट्टे अंक प्राप्त करुन घेण्यासाठी, या महाविद्यालयाच्या नावाने प्रस्तुत प्रकरणी पत्रव्यवहार/ई-मेल करणे आपणावर वंधनकारक असून, प्रस्तुत प्रकरणीच्या अधिक माहितीकरीता मध्यवर्ती ग्रंथालय विभागाच्या अधिकृत ई-मेल आय. डी. वर प्रस्तुत पत्रव्यवहाराची/ई-मेलची एक प्रत किंवा ई-मेलची सीसी करणे आवश्यक आहे.

९) या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागास आवश्यक असलेल्या नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) संवंधित प्रकाशकास या महाविद्यालयाच्या/संस्थेच्या नावाने भरणे व संवंधित प्रकाशकाकडून वर्गणी (रक्कम) मिळाल्यावावतची पोहोच घेणे आवश्यक आहे.

१०) नियतकालिक पुरवठादारास (आपणास) थकीत देयकावर कोणत्याही स्वरूपाचे व्याज अदा करण्यात येणार नाही.

११) या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागाच्या व गुड ऑफिसेस कमिटी (GOC), नवी दिल्ली यांच्या अटी व शर्तीच्या अनुषंगाने नियतकालिक पुरवठादारास नियतकालिकांची वर्गणी प्रकाशकास भरण्याकरीता/पुरवठा करण्याकरीताचे आदेश दिल्यानंतर, नियतकालिकांच्या पुरवठ्या संवंधित, नियतकालिक पुरवठादारास रु. ५००/- (अक्षरी पाचशे रुपये फक्त) रुपयांच्या मुद्रांक कागदावर (स्टॅम्प पेपरवर) हमीपत्र/करारपत्र देयकासोवत सादर करणे नियतकालिक पुरवठादारावर (आपणावर) वंधनकारक आहे.

१२) नियतकालिक पुरवठादार यांच्या फर्मची (आपली) जीएसटीवावतची शासनाकडे नोंदणी असलेल्या प्रमाणपत्राची प्रत जोडणे आवश्यक आहे.

१३) या महाविद्यालयास सिलवंद दरपत्रक सादर करताना/पाठविताना पाकीटावर/लिफाप्यावर **प्रति, मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती, जि. पुणे., प्लॉट नं १०७, एमआयडीसी, महिला शासकीय ग्रामीण रुग्णालयासमोर, बारामती, ४१३१३३.** असा ठळक अक्षरात पत्ता नमुद करावा.

१४) तसेच सिलवंद लिफाप्यावर **"सन २०२३ या कॅलेंडर वर्षाकरीता नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) भरण्याकरीताचे दरपत्रक"** असे ठळक अक्षरात नमुद करावे. सदरहू सिलवंद दरपत्रक या कार्यालयास **दि. ____/११/२०२२** रोजी पर्यंत **संध्याकाळी ५:००** वाजेपर्यंत पोहोच करावे. तद्नंतर प्राप्त झालेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.



Scanned with CamScanner

१५) तसेच सदरचे दरपत्रक भारतीय डाक सेवेमार्फत किंवा हस्तबटवड्याने किंवा कुरिअर सेवेमार्फत दि. १४/१२/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी या महाविद्यालयाच्या कार्यालयात प्राप्त झाल्यास आपले दरपत्रक ग्राह्य धरले जाईल. अन्यथा तद्नंतर प्राप्त झालेले दरपत्रक तुलनात्मक तक्त्यासाठी विचारात घेतले जाणार नाही.

१६) कोणत्याही नियतकालिक पुरवठादाराचे या महाविद्यालयास ई-मेलद्वारे पाठविण्यात/सादर करण्यात आलेले दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

## ❖ दरपत्रकासोबत खालील नमुद केलेल्या मुद्यांन्वये आवश्यक ते कागदपत्र/ दस्तऐवजांच्या छायांकित प्रत जोडणे अनिवार्य आहे.

१) गुड ऑफिसेस कमिटी (GOC), नवी दिल्ली यांचे अधिकृत सन २०२२-२३ या वर्षाकरीता सभासद असल्यावावतच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत.

२) पॅन कार्डची छायांकित प्रत. तसेच जे नियतकालिक पुरवठादार या पत्रात नमुद केल्याप्रमाणे अटी, शर्तीनुसार सदरचे दरपत्रक या महाविद्यालयास सादर करणार आहेत. त्यांच्या पॅनकार्डची छायांकित प्रत दरपत्रकासोवत सादर करणे अनिवार्य असल्यामुळे, ज्यांचे पॅनकार्ड फर्मच्या नावे नसेल, त्यांनी ज्यांच्या नावे पॅन कार्ड आहे, त्यांचे व फर्म यांच्यावावत आवश्यक असणारे दस्तऐवज दरपत्रकासोवत जोडणे आवश्यक आहे.

३) मागील सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या (Assessment Year २०२२-२३) कालावधीचे आयकर परतावा/निपटारा विवरणपत्र/प्रमाणपत्र (Income Tax Return Acknowledgement) ची छायांकित प्रत.

४) पुस्तक खरेदीवावत व नियतकालिकांची वर्गणी भरण्यावावत, गुड ऑफिसेस कमिटी (GOC), नवी दिल्ली यांचे अटी, शर्ती असलेले, तसेच नियतकालिकांचा अधिकृत/मान्यताप्राप्त पुरवठादारांची यादी असलेल्या माहे ऑक्टोंवर, २०२२ /माहे नोव्हेंवर, २०२२ च्या संपूर्ण परिपत्रकाची प्रत.

५) जीएसटी वावतची शासनाकडे नोंदणी असलेल्या प्रमाणपत्राची प्रत.

६) भागीदार/संचालक मंडळाचे पॅनकार्ड, फोन नंवर सहीत पूर्ण पत्ता व ई-मेल आय. डी. इत्यादीवावतची माहिती असलेली प्रत.

७) प्रस्तुत प्रकरणी ज्या वँकेमार्फत व्यवहार केला जातो किंवा करणार आहे. त्या वँकेचे नाव आणि पूर्ण पत्ता व ई-मेल आय. डी. सह माहिती किंवा इतंभूत माहिती असलेली प्रत.

८) आपण महाराष्ट्र राज्यामध्ये सन २०२२ या कॅलेंडर वर्षामध्ये (सन जाने. २०२२ ते डिसें. २०२२ या कालावधीमध्ये) शासकीय महाविद्यालयास/संस्थेस वैद्यक शास्त्राच्या नियतकालिकांचा पुरवठा करीत असल्यास, त्या शासकीय महाविद्यालयाची/संस्थेची नावाची यादी असल्यास सोवत जोडण्यात यावी.



Scanned with CamScanner

(सन २०२१ व त्या अगोदर वैद्यकीय शास्त्रातील नियतकालिकांचा पुरवठा करीत असलेल्या महाविद्यालयाच्या/संस्थांच्या नावाची यादी दरपत्रकासोवत जोडण्यात येवू नये. तसेच खाजगी महाविद्यालयाची/संस्थेची नावाची यादी जोडण्यात येवू नये.)

९) वाचनसाहित्यांची (नियतकालिक /पुस्तक) आयात-निर्यात वावतचे व दुकाने व आस्थापना/ नोकरी व सेवाशर्तीचे नियमवावतचे प्रमाणपत्र तसेच प्रस्तुत प्रकरणी इतर आवश्यक असणाऱ्या प्रमाणपत्रची प्रत.

१०) इतर कागदपत्र.

❖ **वर नमुद केल्याप्रमाणे गुड ऑफिसेस कमिटी (GOC), नवी दिल्ली व या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागाच्या अटी, शर्ती च्या अनुषंगाने, सन २०२३ या कॅलेंडर वर्षाच्या (जाने. २०२३ ते डिसें. २०२३ या कालावधीकरीताच्या) नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) संबंधित प्रकाशकास भरण्याकरीता/या महाविद्यालयाचे आदेश मिळविण्याकरीता/सदस्यत्वाकरीता, खालील मुद्यांसमोर नियतकालिक पुरवठादाराने (आपण) आपल्या अटी/शर्ती मुद्येनिहाय स्पष्टपणे दरपत्रकामध्ये नमूद करण्यात याव्यात.**

१) नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) भारतीय व परकीय प्रकाशकास भरण्यावावत:-

२) प्रकाशकाने नियतकालिकांची किंमत सन २०२३ या कॅलेंडर वर्षाकरीता प्रकाशीत केल्यानंतर, प्रकाशकाने मध्येच किंमत वाढवली तर, किंवा इतर वावींकरीताच्या पुरवणी देयकावावत:-

३) या महाविद्यालयास आवश्यक असलेल्या नियतकालिकांची वर्गणी भरण्याकरीता आपणास आदेश दिल्यास, व प्रकाशकाने सन २०२३ या कॅलेंडर वर्षाकरीताच्या नियतकालिकांची किंमत प्रकाशीत केली नसल्यास त्यावावत:-

४) नियतकालिकांचे सुट्टे अंक हाताळणीकरीता, भारतीय डाक सेवेमार्फत (पोस्टाने), किंवा परकीय प्रकाशकाची नियतकालिकांचे सुट्टे अंक कुरीअर सेवेमार्फत या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागात पोहोच करण्याकरीताच्या शुल्क आकारणीवावत:-

५) नियतकालिकांचे सुट्टे अंक भारतीय डाक सेवेमार्फत (पोस्टात) अथवा कुरीअर सेवेमार्फत किंवा प्रकाशकाने पुरवठा न केल्यास, त्या गहाळ झालेल्या सुट्ट्या अंकावावत:-

६) या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागामध्ये जर वर्षभरामध्ये एखाद्या नियतकालिकांच्या सुट्ट्या अंकाचा एकही अंक प्राप्त न झाल्यास, त्या नियतकालिकांवावत किंवा जे अंक प्राप्त झालेले नसतील किंवा नाहीत त्यावावत:-

७) या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागास आवश्यक असलेल्या नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) प्रकाशकास भरण्याकरीता, नियतकालिक पुरवठादारास (आपणास) आदेश दिल्यास, एकूण आदेशाच्या ५% सुरक्षा अनामत रक्कम म्हणून वँक गॅरंटी या महाविद्यालयाच्या नावे दोन वर्षाच्या कालावधीसाठी द्यावी लागेल. व सदरील नियतकालिकांच्या सुट्ट्या अंकाचा पुरवठा जर विहित कालावधीमध्ये पूर्ण न झाल्यास, किंवा अन्य कारणास्तव पुरवठा न झाल्यास, किंवा या



Scanned with CamScanner

महाविद्यालयाच्या नावे संवंधित प्रकाशकास नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) न भरल्यास, नियतकालिकांच्या एकूण आदेशाच्या ५% रक्कम सुरक्षा अनामत म्हणून जी वॅक गॅरंटी या महाविद्यालयाकडे जमा करण्यात आलेली आहे. ती सर्व ५% वॅक गॅरंटीची रक्कम दंडात्मक कारवाई म्हणून कपात करण्यावावत:-

८) नियतकालिकांच्या पुरवठ्यावावत/वितरणावावत:-

९) नियतकालिकांच्या पुरवठ्यावावत या महाविद्यालयाच्या मध्यवर्ती ग्रंथालय विभागास भेट (व्हीजीट) देणेवावत किंवा इतर सेवा देण्यावावत:-

१०) या महाविद्यालयास आवश्यक असणाऱ्या नियतकालिकांच्या पुरवठ्याचे आदेश दिल्यानंतर सवस्क्रिपशन आय. डी. वावत/प्रकाशकास वर्गणी (रक्कम/पैसे) दिल्यावावतचे वॅंक रेमिन्टन्स तसेच आपणाकडून या महाविद्यालयाच्या नावे नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) मिळाल्यावावत संवंधित प्रकाशकाने आपणास दिलेली/मिळालेली पोहोचवावत:-

११) या महाविद्यालयाने आपणास नियतकालिक पुरवठ्याचे आदेश दिल्यानंतर नियतकालिकांची वर्गणी (रक्कम) संवंधीत प्रकाशकास भरलेली आहे किंवा नाही, त्याकरीता संवंधीत प्रकाशकाचा ई-मेल आय. डी. तसेच प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेला पत्रव्यवहार (ई-मेल) व संवंधीत प्रकाशकाकडून या महाविद्यालयाच्या नावे आपणास करण्यात आलेला पत्रव्यवहार (ई-मेल) इत्यादी वावत:-

१२) वर नमुद केलेल्या या महाविद्यालयातील मध्यवर्ती ग्रंथालय विभागाच्या अनु. क्र. १ ते १६ वावत व गुड ऑफिसेस कमिटी (GOC), नवी दिल्ली यांच्या नियतकालिक पुरवठ्याच्या संपूर्ण अटी, शर्ती वावत:-

१३) वर नमुद केलेल्या अटी व शर्ती व्यतीरिक्त, नियतकालिक पुरवठादाराच्या (आपल्या) अजून काही इतर अटी, शर्ती असल्यास त्यावावत:-

आपण सादर केलेले दरपत्रक स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार खाली स्वाक्षरी करणार मा. अधिष्ठाता यांनी राखून ठेवले आहेत.

टिप:- मे. टोटल आय.टी. सोल्युशन्स. प्रा. लि., नवी दिल्ली., यांची सन २०२० या कॅलेंडर वर्षाच्या नियतकालिके पुरवठ्याची सेवा समाधानकारक नसल्यामुळे, संवधिताने प्रस्तुत प्रकरणी दरपत्रक सादर करु नये. जर संवधिताने या महाविद्यालयास दरपत्रक सादर केल्यास सदरचे दरपत्रक तुलनात्मक तक्त्यासाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही, याची नोंद घावी.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वारामती.



Scanned with CamScanner